# निम्नस्तर कृषि शिक्षण विभागांतर्गत कृषि तंत्र पदविका, कृषि तंत्रज्ञान पदविका (Diploma in Agricultural Technology) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरी (Spot Admission Round) राबविणेबाबत सूचना

कृषि तंत्र पदविका, कृषि तंत्रज्ञान पदविका (Diploma in Agricultural Technology) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेची रिक्त जागांकरिता **'विद्यालयस्तरीय जागेवरी विशेष प्रवेश फेरी'** (Spot Admission Round) कार्यक्रम पत्रिकेनुसार दिनांक १३/०८/२०१९, दिनांक १४/०८/२०१९ व दिनांक १६/८/२०१९ या कालावधीत प्रत्येक विद्यालयात राबविण्यात येणार आहे. सदर प्रवेश प्रक्रिया खालीलप्रमाणे असेल.

## विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरी (Spot Admission Round) प्रवेश प्रक्रिया

(१) कृषि पदविका प्रवेश प्रक्रिया सन २०१९–२० च्या तीनही फेऱ्या संपल्या नंतर सदर प्रवेश प्रक्रियेत रिक्त राहतील त्याच जागा दि. १३/८/२०१९, दि. १४/८/२०१९ व दि. १६/८/२०१९ या दिनांकास कार्यक्रम पत्रिकेनुसार भरण्यात येतील.

(२) दि. १३/८/२०१९, दि. १४/८/२०१९ व दि. १६/८/२०१९ रोजी प्रत्येक दिवशी सकाळी १०.०० ते १.३० या वेळेत प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज विहीत शुल्कासह व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित व मूळ प्रतींसह जमा करुन छाननी करुन विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्यात येईल व दुपारी ३.०० वाजेपासून गुणवत्ता यादी तयार करुन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात येईल. **(वरील प्रमाणे प्रवेशासाठी उपस्थित प्रत्येक विद्यार्थ्यास संबंधित विद्यालयांतील प्राचार्यांमार्फत उपस्थिती पत्रक देण्यात येईल)**

(३) उपरोक्त दिनांकास महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालयातील प्रथम त्या–त्या जिल्हयातील ST उमेदवारास प्रवेश देण्यात येईल. सदर प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर एखाद्या जिल्हयाची जागा रिक्त राहिल्यास गुणवत्तेनुसार (ठाणे, पालघर, रायगड, अ.नगर, नंदूरबार, धूळे, नाशिक) सर्व जिल्हयातील उमेदवारांमधून एकत्रित गुणवत्तेनुसार जागा भरण्यात येतील.

**(टिपः– सदर प्रवेश प्रक्रिया महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालय, कोसबाडहिल, ता. डहाणू, जि. पालघर फक्त याच विद्यालयासाठी आहे)**

(४) अनुदानित व विनाअनुदानित कृषि तंत्र विद्यालय व कृषि तंत्र निकेतनातील रिक्त जागा **(SC/ST/VJ(A)/NT(B)/NT(C)/NT(D)/OBC/SBC/SEBC/EWS)(AG/FF/PD/DP/PH)** त्या–त्या प्रवर्गातील उपलब्ध आणि नोंदणीकृत उपस्थित उमेदवारांमधून भरल्या जातील. तसेच महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गाच्या पुरूष उमेदवारास प्रवेश देण्यात येईल.

(५) उपरोक्त प्रवेश प्रक्रियेनंतर जर जागा रिक्त राहिल्यास सर्वप्रथम एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २% टक्यांपर्यंत विशेष मागास प्रवर्ग (SBC) उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

(६) रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील **(SBC)** उमेदवारांना प्रवेश क्षमतेच्या कमाल २% जागांवर प्रवेश दिल्यानंतर जागा रिक्त राहिल्यास त्या जागा इतर सर्व प्रवर्गातील **(SC/ST/VJ(A)/NT(B)/NT(C)/NT(D)/OBC/SEBC /EWS)** या सर्व प्रवर्गातील उमेदवारांची सरमिसळ करून गुणवत्तेनुसार जागा भरण्यात येतील या पध्दतीनेही आरक्षित जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास त्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

(७) उपरोक्त प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांची गुणवत्ता व आरक्षण विचारात घेवून दिनांक १३/८/२०१९, दि. १४/८/२०१९ व दि. १६/८/२०१९ या प्रत्येक दिवशी विहित वेळेत प्राप्त अर्जाची छाननी करुन प्रत्येक दिवशीच्या अंतिम राज्यस्तरीय गुणवत्ता यादीच्या आधारे (जिल्हाबंदी न ठेवता) उमेदवारांना प्रवेश वाटप करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादी ही त्याच दिवसा करीता मर्यादित राहील. **(प्रत्येक दिवसाकरीता प्रवेशोच्छूक विद्यार्थ्यांच्या उपस्थिती प्रमाणे गुणवत्ता यादी तयार करुन त्या विद्यार्थ्यांना त्याच दिवशी आरक्षण विचारात घेवून गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.)**

(८) मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम शिरगांव, ता. जि. रत्नागिरी करीता विद्यापीठ आरक्षण ७० टक्के व महाराष्ट्र राज्य आरक्षण ३० टक्के **(U & M Quata)** असतो. सदर अभ्यासक्रमासाठी उमेदवार उपलब्ध न झाल्यास व जागा रिक्त राहिल्यास त्या जागा इतर सर्व प्रवर्गातील **(SC/ST/VJ(A)/NT(B)/NT(C)/NT(D)/OBC/SBC/ SEBC/EWS)** या सर्व प्रवर्गातील उमेदवारांची सरमिसळ करून गुणवत्तेनुसार जागा भरण्यात येतील या पध्दतीनेही आरक्षित जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास उपस्थित विद्यार्थ्यांमधून त्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

(टिपः– सदर प्रवेश प्रक्रिया मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम शिरगांव, ता. जि. रत्नागिरी फक्त याच विद्यालयासाठी आहे.)

**दि. १३/८/२०१९, दि. १४/८/२०१९ व दि. १६/८/२०१९ रोजीची प्रवेश प्रक्रिया उपरोक्त अ. क्र. १ ते ८ येथे दर्शविल्याप्रमाणे विद्यालयस्तरावर राबविण्यात येईल. यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावर www.dbskkv.org येथे प्रसिध्द करण्यात आलेल्या कृषि पदविका माहिती पुस्तिका सन २०१९–२० मधील सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी कृषि पदविका माहिती पुस्तिकेतील पृ. क्र. १ ते ११ वर नमुद करण्यात आलेल्या विद्यालयांशी प्रत्यक्ष संपर्क साधून संबंधित विद्यालयात प्रवेशासाठी उपस्थित रहावे.**

सहयोगी अधिष्ठाता
निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग